## वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांकः- ०१/०१/२०१८

# जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार युवक- युवतींसाठी भव्य रोजगार मेळावा

दिनांक २ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र पोलीस दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. गडचिरोली पोलीस दलाने मा. पोलीस अधिक्षक सो. गडचिरोली यांच्या संकल्पनेतून हया दिनाच्या निमित्ताने दिनांक २ जानेवारी ते ८ जानेवारी 'रेझींग डे' च्या माध्यमातून आठवडाभर विविध लोकांउपयोगी कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. यामध्ये शालेय विद्यार्थ्यासाठी शस्त्र प्रदर्शनाचा कार्यक्रम त्याचबरोबर वाहतुक नियमांचे सर्वांना ज्ञान अवगत व्हावे यासाठी शाळा व महाविद्यालये या मध्ये वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांचा कला गुणांना वाव मिळावा यासाठी 'माझा जिल्हा माझा पोलीस' या विषयांवर भित्तीचित्र स्पर्धेचे आयोजन केलेले असून विदयार्थ्याच्या स्वप्नातील गडचिरोली जाणून घेण्यासाठी माझा स्वप्नातील गडचिरोली या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे.

दिनांक ५/०१/२०१८ रोजी गडचिरोली जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार युवक- युवतींसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून त्यात नामांकित कंपणीव्दारे जिल्हयातील तरुण- तरूर्णींना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामध्ये ५ वी ते १२ वी पास/नापास सर्व पदवीधर, पदव्युत्तर, डिप्लोमा, आय टी आय (० ते १० वर्ष ) कामाचा अनुभव असलेले तसेच अंतिम वर्ष परिक्षेला बसलेले उमेदवार यांना सुवर्ण संधी प्राप्त होणार आहे. सोबत येतांना उमेदवाराने अदयपावत बायोडाटा, दोन कलर फोटो व मुळ कागदपत्रे आणि त्याची झेरॉक्स प्रत आणणे गरजेचे आहे. हा मेळावा संस्कृतिक भवन, आरमोरी रोड गडचिरोली येथे होणार आहे.

याचबरोबर पथनाटयाचा माध्यमातून अंधश्रध्दा, व्यसनमुक्ती इ. विषयांवर मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता तणावमुक्त जीवन कसे जगावे यासाठी मार्गदर्शनाचे आयोजन केले आहे.